# निविदा सूचना

**विषय:-** रिसोग्राफर मशीन दुरुस्ती व देखभाल वार्षीक दरकरार करणेबाबत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, २ रा मजला, रुम नं.२२५ (विस्तरा) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या विभागामध्ये कॅनन डिजिटल डुल्पीकेटिंग मशीन मशीन (RISO EZ २२१A) या कंपनीची रिसोग्राफर मशीन वापरात आहे. सदर रिसोग्राफर मशीनसाठी सन २०२१-२०२२ या वर्षासाठी वार्षीक देखभल व दुरुस्ती, तसेच मास्टर रोल, इंक कार्टेज इत्यादीचा पुरवठा करण्यासाठी इच्छूक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

या वार्षिक दरकराराकरीता खालील अटी व शर्ती लागू राहतील:-

१) संबंधित कंपनीने रिसो मशीन करीता चांगल्या दर्जाच्या साहित्याचा दरकराराच्या दिनांकापासून पुढील एक वर्षासाठी पुरवठा करणे बंधनकारक असे १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देण्यात यावे.

२) विभागाने मागणी केल्यापासून २४ तासात पुरवठादाराने साहित्य पुरविणे आवश्यक राहील व पुरविण्यात आलेल्या मालाची प्रतवारी व दर्जा हा योग्य नसल्याचे आढळून आल्यास सदरहू करार एकतर्फी संपुष्टात येईल व पुरवठादारास काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

३) निर्धारित केलेल्या एक वर्षाच्या कालावधीत रेसोशी संबंधीत साहित्याच्या दरामध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झालीतरी पुरवठादाराने दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन मिळणार नाही.

४) रिसो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सोबत अधिकृत पुरवठादार करार केला असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

वरीलपैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदरहू करार कोणतीही पूर्व सूचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनाकडे राहील. वरील अटी व शर्ती मान्य आसल्यास आपण ही निविदा प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत बंद पाकिटामध्ये (लिफाफा) आपले दरपत्रक या विभागास सादर करावे.

(सु.ज्ञा.रेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

C:\Users\laxman.shinde\Desktop\New folder (2)\2019\Backup of Backup of रिसोग्राफर मशीन दुरुस्ती देखभाल दर करार 2018-19-19-20.docx